**राज्यस्तरीय अँग्रोअँडव्हायजरी समितीच्या दि.१८/०९/२०१८ च्या बैठकीतील कृषि हवामान विषयक संदेश खालीलप्रमाणे आहे.**

**हवामानाचा अंदाज -**

१) पुढील ५ दिवसात कोकणात पावसाची शक्यता आहे.
२) मध्य महाराष्ट्रात दिनांक १८, २१ व २२ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी तसेच दिनांक १९ व २० सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.
३) मराठवाडा, विदर्भात दिनांक १८ व १९ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी तसेच दिनांक २० व २२ सप्टेंबर पर्यंत काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.
४) विदर्भ विभागात दिनांक १८ व १९ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी तसेच दिनांक २० व २२ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी व दिनांक २१ सप्टेंबर रोजी अनेक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.
५) **इशारा -** दिनांक १८ सप्टेंबर रोजी कोकण व मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजाच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.
दिनांक २१ सप्टेंबर रोजी कोकण व विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.
दिनांक २२ सप्टेंबर रोजी कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

**कृषि सल्ला -**

१) पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे भात पिकात पाणी देण्याची व्यवस्था करावी.भात शेतात पाण्याची पातळी ५ ते १० सेंमी ठेवावी.
२) भात पिकावर कडाकरपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी कॉपर ऑक्झिक्लोराईड २५ ग्रॅम किंवा कार्बेनडेझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळुन फवारावे.
३) मध्य महाराष्ट्रामध्ये सोयबीन पिकावर पाने खाणा-या अळीच्या व चक्री भुंगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्लोवरँट्रॅनिप्रोल१८.५% प्रवाही ३ मिली किंवा ल्युफेन म्युरॉन ५.४ % प्रवाही १२ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
४) कापुस पिकात पाने, फुले, बोंडे यांची गळ कमी होण्यासाठी प्लॅनोफिक्स या संजिवकाची एकरी ४० मिली प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
५) मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात पुढील ५ दिवसात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता असून खरीप पिकांना गरज असेल तरच हलके ओलीत करावे.
६) ऊसावरील हुमणी नियंत्रणासाठी. जमिनीतून फोरेट १० % दाणेदार २५ किलो किंवाकोर्बोफ्युरॉन ३ %दाणेदार किटकनाशक ३३ किलो प्रति हेक्टर वापरावे.
७) विदर्भात रब्बी करडई पिकांच्या पेरणीसाठी शेत तयार करावे.

**टिप:-आपले झोन/जिल्ह्यानुसारचे संदेश आपले स्तरावरुन पाठविण्यात यावेत.**